भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०८/२०

**१) चारचाकी वाहनाच्या धडकेत दोन जखमी . :—**

दिनांक १८/०८/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील जखमी दिलीप ईस्तारी वैद्य वय २५ वर्ष, व निलजराज पंजाबराव सतिकोसरे वय २५ वर्ष, दोन्ही रा. नेहारवानी हे खरबी कडुन पेट्रोल पंप कडे मोटार सायकलने येत असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार सायकला धडक मारुन दोघांनाही जखमी केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी लक्ष्मण पंजाबराव सतिकोसरे वय २३ वर्ष, रा. नेहारवानी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १६/०८/२०१७ चे १२.०० ते १७.३० वा. दर. यातील मृतक सुरेश कारु पटले वय ४२ वर्ष, रा. डोंगरी बुज याने जास्त प्रमाणात मद्य सेवन केल्यामुळे त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास औषोधोपचाराकरीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता दिनांक १६/०८/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौचे प्राप्त कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. निखाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**३) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :—**

**अ)** दिनांक १८/०८/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन क्र. एमएच ३१ एटी ८२०२ चा चालकाने आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच वाहतुकीस अडथडा निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि. यादव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वकेकार पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १८/०८/२०१७ चे १७.१० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन क्र. एमएच ३६ एपी ३०९८ च्या चालाकने आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच वाहतुकीस अडथडा निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि. यादव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वकेकार पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १८/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.